## तंटामुक्ती अध्यक्षपदी हरिभाऊ खवास यांची फेरनिवड

**लाखनी :** मानेगाव सडक येथे आज दिनांक २८ ऑगस्ट रोज शुक्रवारला तंटामुक्ती समिती अध्यक्ष निवडीसाठी ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले.या सभेत हरिभाऊ पिसाराम खवास यांची फेरनिवड करण्यात आली. हरिभाऊ खवास यांची मागील वर्षी सन २०२४-२५ करीता तंटामुक्ती समिती अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यांचा कार्यकाल संपल्याने मानेगाव ग्रामपंचायत कार्यालयात तंटामुक्ती अध्यक्ष निवडीसाठी सरपंच आशा सिंगनजुडे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले. या सभेत हरिभाऊ खवास यांचा एकमेव अर्ज आल्याने व मागीलवर्षी त्यांनी योग्य कार्य केल्याने आणि गावात सामाजिक सलोखा राखल्याने ग्रामसभेने त्यांच्यावर परत एकदा विश्वास दाखवत त्यांची मानेगाव तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी फेर निवड केली. यावेळी उपसरपंच अजित मेश्राम, ग्रामसेवक मुनीश्वर खंडाईत, माजी उपसरपंच नरेंद्र भांडारकर, अशोक चेटूले,रामाजी समरीत, विलास गोस्वामी व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. एकमताने तंटामुक्ती समिती अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल नवनियुक्त अध्यक्षानी ग्रामसभेचे व गावकऱ्यांचे आभार मानले. तर ग्रामपंचायत कामिटी व सरपंचा आशा सिंगनजुडे, ग्रामपंचायत सदस्य अल्का डोरले, अंजली कुलसुंगे, कुंजना नेवारे तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष योगेश सिंगनजुडे यांनी अभिनंदन केले.

## जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व भूमि अभिलेख विभागाची कार्यशाळा संपन्न

**भंडारा :** मुख्य न्यायाधीश भंडारा यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण भंडारा व जिल्हा अधिवक्ता संघ भंडारा यांच्या वतीने आयोजीत कार्यशाळेमध्ये श्री.प्रकाश ढगे,(प्र.)जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख भंडारा यांच्या तर्फे भूमि अभिलेख विभागामार्फत सुरू असलेल्या शासनाच्या विविध योजना तसेच नागरीकांनी ऑनलाईन अपील अर्जाबाबत 'प्रत्यय' व फेरफार अर्ज करणेबाबत ' इप्सित' आज्ञावली, ई-मोजणी VER २ बाबतच्या माहितीचे सादरीकरण करून वकील ,पक्षकारांना काळाप्रमाणे महसूल कायदयात होणाऱ्या बदलाची माहिती सांगण्यात आली ज्यामुळे याचा फायदा उभय पक्षांना,वकील मंडळींना होईल याबाबत मार्गदर्शन केले.

# सातत्याने सर्व्हर डाऊन; ई-पीक पाहणी खोळंबली

## जिल्ह्यातील शेतकरी त्रस्त ; अँपवरून ४.०.० व्हर्जनमध्ये पीक पेरा नोंदवायचा कसा ?

**महासागर प्रतिनिधी**
**सिहोरा ,दि.१२सप्टेबर:** राज्यात यंदाच्या खरीप हंगामात १ ऑगस्टपासून शेतकरी स्तरावर ई-पीक पाहणी सुरू आहे. शेतकऱ्यांना संबंधित शेती गटाच्या २०-२५ मीटरच्या आतील पिकांचे दोन फोटो अपलोड करणे गरजेचे आहे. परंतु, प्रारंभापासून मोबाईल अँप लॉगीन होत नाही. सातत्याने सव्हर डाऊन राहतो. त्यामुळे पीक नोंदणीसाठी शेतावर गेलेल्या शेतकऱ्यांना निराशेने परतावे लागते. १४ सप्टेंबर ही ई-पीक पाहणीची अंतीम तिथी आहे.

वेळेत नोंदणी न झाल्यास संभाव्य नुकसानीपासून शेतकऱ्यांना वंचित राहावे लागणार आहे.



भरपाईसाठी या नोंदी असतात महत्वाच्या :- ई-पीक पाहणी प्रकल्प विभागाने तयार केलेल्या मोबाइल ॲपद्वारे पिकांचा फोटोसह ऑनलाइन पिक पेरा शेतकऱ्यांद्वारा नोंदविण्यात येतो. यात शेतीचा नकाशा, पिकांची नोंदणी, फोटो अपलोड व सात-बारा लिंक करण्याची सुविधा आहे.

या नोंदणीमुळे नैसर्गिक आपत्तीत भरपाई, हमीभावाने खरेदी, पीक विमा, पीक कर्ज यासह शासनाच्या विविध योजनेचा लाभासाठी इपिक नोंद घेणे अनिवार्य आहे. या ई-पीक पाहणीत बांधावरची झाडे, यासह पडक्षेत्राची नोंद करता येते. या पेऱ्याची नोंद सातबारावर होत असते.

यावर्षी ई-पीक पाहणी डीसीएस मोबाइल अँप गुगल प्ले स्टोअरवर ४.०.० व्हर्जनमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे.

**शेतकरी लॉगीननंतर नोंदणी पुढे सरकेना :-**

अँप डाउनलोड झाल्यानंतर आधार व मोबाइल नंबर वापरून विभागाची नोंदणीनंतर शेतकरी लॉगिन करावी लागते. त्यानंतर आपल्या नावावरची जमीन निवडा, पीक निवडा, पीक क्षेत्र, पेरणी दिनांक, फोटो इत्यादी माहिती भरावी लागते. नोंद सेव्ह केल्यावर सातबारावर पिकाची नोंद होते. परंतु, अँप शेतकरी लॉगीननंतर पुढे जात नसल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत. शेतकरी लॉगीन पुढे अँप सरकत नसल्याने खोळंबा वाढला आहे.

> 'ई-पीक पाहणीचे नवे व्हर्जन शेतकरी लॉगीननंतर पुढे सरकत नाही. सातत्याने सर्व्हर डाऊन राहतो. तीनदा शेतावर जाऊन पीक पेरा नोंद करण्याचा प्रयत्न केला.
> परंतु, निराशाच हाती लागली. ही समस्या बहुतेक शेतकऱ्यांची आहे.'
> **मोतीलाल ठवकर, शेतकरी, सिंदपुरी**

# डीएडच्या विद्यार्थ्यांची वृध्दाश्रमास भेट



**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा :** इंदुताई अध्यापक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी बेला येथील वृद्धाश्रमास भेट देऊन तेथील वृद्ध महिलांची आस्थेने विचारपूस करून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

इंदुताई अध्यापक महाविद्यालयातील बीएड द्वितीय सत्रच्या विद्यार्थ्यांनी सामुदायिक सहभागीता व स्पेशल कमुनिटी व्हिजीट या प्रकल्पांतर्गत वृद्धाश्रम भेट देण्यात आली.

यावेळी भारतीय औषधी अनुसंधान संस्थेद्वारा संचालित या वृध्दाश्रमात उपस्थित वेगवेगळ्या स्तरातून आलेल्या महिलांच्या समस्या जाणून घेत महिलांसोबत संवाद साधला गेला.

या संस्थेचे संचालक डॉ. वानखेडे यांनी संस्थेची संपूर्ण माहिती व कार्यप्रणाली याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

महाविद्यालयातील प्राचार्या डॉ. सुषमा शर्मा यांच्या मार्गदर्शनात सदर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यशस्वीतेकरिता प्राध्यापिका मेघा खोब्रागडे, प्राध्यापक घोटी तसेच सर्व छात्र अध्यापकांनी विशेष सहकार्य केले.

## माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन सोहळा : कार्यक्रमाला उपस्थित माजी विद्यार्थी



**महासागर प्रतिनिधी**
**सिहोरा दि.१२सप्टेंबर:** साक्षरता आंतरराष्ट्रीय दिनानिमित्त कला महाविद्यालय, सिहोरा येथे ८ सप्टेंबरला माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन कार्यक्रम पार पडला.

शैक्षणिक क्षेत्रात व जीवनातील मागील घडामोडींची व त्या क्षणाची आठवण राहावी व उत्साह द्विगुणीत व्हावा यासाठी स्नेहमिलन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सन २००९ पासून शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन कार्यक्रम मिलिंद रोकडे व इंद्रा शरणांगत यांच्या कल्पनेतून घेतला आहे. याप्रसंगी कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन चापले, संस्थेचे अध्यक्ष दिलीपराव सोमनाथे, प्रॉपर्टी डीलर किशोर राहंगडाले, डॉ. मंजूषा गभने, डॉ. चंद्रशेखर भेजे, डॉ. मदन प्रधान, डॉ. जयकुमार क्षीरसागर, प्रा. रेणुका पटले, प्रा. राजेश अंबुले, गोवर्धन शेंडे, सचिन शरणागत, जितू पटले व प्रवीण उरकुडे तसेच माजी विद्यार्थी प्रामुख्याने उपस्थित होते.

## थकबाकीदारांसाठी एकरकमी परतावा योजना ३१ मार्च २०२६ पर्यत

**भंडारा :** १४ ऑगस्ट,२०२५ रोजीच्या परिपत्रका नुसार थकीत कर्ज प्रकरणात संपूर्ण कर्ज रक्कमेचा एकरकमी भरणा करणाऱ्या लाभार्थी यांना थकीत व्याज रक्कमेत ५०/टक्के सवलत देण्याबाबतची एकररक्कमी परतावा योजना ३१ मार्च,२०२६ पर्यत राबविण्यात येत आहे.त्यानुसार महामंडळाच्या थकबाकीदार लाभार्थीना या योजनेचा लाभ घेऊन कर्ज मुक्त व्हावे असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय विकास महामंडळ भंडारा विभागानी कळविले आहे.

## श्रीमती रेवाबेन मनोहरभाई पटेल महिला कला महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा दि.१२सप्टेंबर:** स्थानीय श्रीमती रेवाबेन मनोहरभाई पटेल महिला कला महाविद्यालय, भंडारा येथे राष्ट्रीय सेवा योजना, व आजीवन अध्ययन विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिन म्हणून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती साजरी करण्यात आली.





या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंजना शृंगारपूरे होत्या. प्रमुख अतिथी प्रा. किशोरदत्त पाखमोडे सर यांनी डॉ. राधाकृष्णन यांच्या जीवनावर मार्गदर्शन केले. प्राचार्या डॉ. शृंगारपूरे यांनी प्रतिपादन केले की, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन आपण शिक्षक दिन म्हणून साजरा करतो. शिक्षक ही भावी पिढीला घडविणारे शिल्पकारच आहेत.

शिक्षक हे ज्ञानाच्या प्रकाशाला विद्यार्थ्यातील सुप्त गुणांना चालना देवून विद्यार्थ्यांना प्रकाशित करतात. या कार्यक्रमाची प्रास्ताविक रासयो अधिकारी डॉ . कैलास ईश्वरकर सर यांनी केले .या कार्यक्रमाचे संचालन। कु . निकिता चोपकर तर आभार कु यामिनी सातपैसे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. चंद्रशेखर शर्मा, डॉ. नरेश बोरकर प्रा. डॉ. राहुल भोरे . ग्रंथपाल वर्षा मेश्राम प्रा. डॉ. श्वेता वेगड, प्रा. सुषमा नरांजे, प्रा. सुभाष पाथोडे, प्रा . राहुल रामटेके प्रा . बंडू पंधरे प्रा . कल्पना नेवारे प्रा . ज्योती सारंगपुरे . बंसीलाल शेंडे यांनी सहकार्य केले. प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व महाविद्यालयातील विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

## खरीप पिकांची ई- पिक नोंदणी १४ सप्टेंबरपर्यत

**भंडारा :** खरीपहंगाम २०२५-२६ मध्ये नैसर्गिक आपत्तीतील पिकाची नुकसान भरपाई, पीक विमा, पीक कर्ज आणि धान खरेदी केंद्र या सुविधांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी आपली पिकांची नोंद ई-पीक पहाणी मोबाईल अँपद्वारे करावी. नोंदणीची मुदत १ ऑगस्ट ते १४ सप्टेंबर २०२५ अशी असून, ही नोंद स्वयंप्रमाणित मानली जाणार आहे. चुकीची नोंद असल्यास शेतकऱ्यांना ४८ तासांत दुरुस्ती करता येईल. ७/१२ उताऱ्यावर नोंद झाल्यास संबंधित सर्व सुविधा उपलब्ध होणार आहेत. नोंदणीस अडचण आल्यास टोल फ्री क्रमांक ०२०-२५७१२७१२ वर संपर्क साधावा, असे जिल्हाधिकारी यांनी आवाहन केले आहे.

## टिळक विद्यालयात एड्स जनजागृती कार्यक्रम



**महासागर प्रतिनिधी**
**साकोली दि.१२सप्टेंबर:** टिळक विद्यालय, खंडाळा येथे जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात, साकोली उपजिल्हा रुग्णालय येथील डॉ. बनसोड मॅडम यांनी विद्यार्थ्यांना एड्स (AIDS) या रोगाबद्दल सखोल मार्गदर्शन केले. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक ए. एन निर्वाण , सेवा जेष्ठ शिक्षक, पी. एन.कापगते ,डी.डी. तुमसरे , कुंभरे , करंजेकर , मेश्राम मॅडम इत्यादी मान्यवर उपस्थित होते.एड्स (अक्वायर्ड इम्युनोडेफिशियन्सी सिंड्रोम) हा एक गंभीर आजार आहे. डॉ. बनसोड मॅडम यांनी एड्स कशामुळे होतो, त्याची लक्षणे काय आहेत आणि यावर नियंत्रण कसे ठेवता येते, याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. त्यांनी एड्सच्या प्रतिबंधासाठी घ्यावयाची काळजी यावर विशेष भर दिला. त्यांच्या मार्गदर्शनपर भाषणातून विद्यार्थ्यांच्या अनेक शंकांचे निरसन झाले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यामध्ये एड्स बद्दलची जागरूकता वाढण्यास मदत झाली.या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजनाबद्दल मृणाली मेश्राम मॅडम यांनी डॉ. बनसोड मॅडम यांचे आभार मानले. सदर कार्यक्रमाकरिता विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# चुल्हाडकरांच्या विकासात मुख्य रस्त्याच्या दुरवस्थेची अडचण

## ग्रामीण रस्तेही खड्डयात : निवेदनाची अद्यापही दखल नाही



चुल्हाड येथील रस्त्यांची अशी अवस्था झाली

**महासागर प्रतिनिधी**
**सिहोरा दि.१२सप्टेंबर:** राष्ट्रीय महामार्गापासून चुल्हाड गावाला जोडणाऱ्या मुख्य मार्गाची दुरवस्था झाली आहे. मार्गावार खड्डेच खड्डे पडले आहेत.

गाव विकासाला मुख्य मार्गाची दुरवस्था अडचण ठरत असल्याने गावकऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. परिसरात ग्रामीण रस्तेही खड्डयात गेले आहेत. देखभाल आणि दुरुस्तीच्या कामाकडे कंत्राटदारांनी पाठ दाखविली आहे.

भंडारा-बालाघाट राष्ट्रीय महामार्गावरून तीन किमी अंतरावर चुल्हाड गावात ये-जा करण्यासाठी मुख्य मार्ग आहे. या मार्गावर आरोग्यवर्धिनी केंद्र आणि जिल्हा परिषद हायस्कूल आहे.

आरोग्य वर्धिनी केंद्रात परिसरातील रुग्ण मोठ्या संख्येने उपचारासाठी येत असतात. खड्यांमुळे रुग्णांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. याच मार्गावरून देवरी देव, सुकळी नकुल आणि गोंडीटोलाचे नागरिक, विद्यार्थी रात्री उशिरापर्यंत याच मार्गाने ये-जा करीत आहेत. दुरुस्तीसाठी निवेदने देऊनही दखल घेण्यात नाही.

**ग्रामीण रस्तेही खड्डयात :-** मुख्यमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत राष्ट्रीय महामार्गाला ग्रामीण रस्ते डांबरीकरणाने जोडण्यात आले आहेत. सुकळी नकुल ते चुल्हाड, सुकळी नकुल ते ब्राहमणटोला, गोंडीटोला ते महालगाव गावाना जोडणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरण झाले आहे.

पाच वर्ष देखभाल आणि दुरुस्तीसाठी कंत्राटदार करारबद्ध असल्याचे माहिती दर्शक फलकावर नमूद असले तरी एकदाही मार्गावरील खड्चाची दुरुस्ती करण्यात आली नाही.

> 'चुल्हाड गावाला जोडणाऱ्या मुख्य मार्गात खड्डेच खड्डे पडले आहेत. मार्गावरील डांबर गायब झाले आहे. ये-जा करताना नागरिकांचे हाल होत आहेत. येत्या महिनाभरात मुख्य मार्गाचे डांबरीकरण झाले नाही तर, आम्ही गावकरी राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको करू.'
> **भास्कर सोनेवाने, माजी सरपंच, चुल्हाड**

## लघु उद्योग भारती भंडारा शाखेद्वारा उद्योजकानची बैठक थाटात



**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा दि.१२सप्टेंबर:** दिनांक २६ ऑगस्ट २०२५ रोजी लघु उद्योग भारती भंडारा शाखे द्वारा उद्योजकांची बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीचे अध्यक्ष आमदार परिणयजी फुके , प्रमुख अतिथी प्रकाशचंद्रजी गुप्ता राष्टीय संघठन मंत्री, लघु उद्योग भारती , महाराष्ट्र प्रदेश प्रभारी बलदेवभाई प्रजापती, राष्ट्रीय उपाध्यक्ष रविंद्रजी सोनवणे , मध्य प्रदेश लघु उद्योग भारती अध्यक्ष अमितजी घैसास व इतर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष परिणयजी फुके ह्यांनी आपल्या भाषणाद्वारे उद्योजनकांना लघु उद्योग हे भारताच्या प्रगतीसाठी खऱ्याअर्थाने कशाप्रकारे महत्वाचे आहे हे सांगितले, भविष्यात भंडारा गोंदिया जिल्ह्या च्या औद्योगिक प्रगतीसाठी विशिष्ठ औद्योगिक प्रकल्प राबवण्याचा प्रत्यन करू असे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी प्रकाशचंद्रजी गुप्ता ह्यांनी लघु उद्योग भारती च्या कार्याबद्दल संपूर्ण माहिती दिली. लघु उद्योग भारती (LUB) ही भारतातील सूक्ष्म व लघु उद्योग क्षेत्राला झपाट्याने प्रमोट करणारी संस्था आहे. तिची स्थापना १९९४ मध्ये झाली. मीलाचा पायरी म्हणून, महाराष्ट्रात तिचे २५० पेक्षा अधिक शाखा आणि ५८० पेक्षा अधिक जिल्ह्यांमधील सदस्यसंख्या आहे. कार्यक्रमात लघु उद्योग भारती भंडारा शाखेची कार्यकारिणीचे पुनर्गठन करण्यात आले. लघु उद्योग भारती भंडारा शाखेचे अध्यक्ष मुरारी काबरा, उपाध्यक्ष नरेंद्र गायधने, महामंत्री रौनक पत्की व कोषाध्यक्ष पंकज मुंधडा ह्यांची नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमात भंडारा जिल्ह्यातील सर्व क्षेत्रातील व्यावसायिक मोठ्या संख्येत सहभागी होते. कार्यक्रमाचे प्रायोजक म्हणून बँक ऑफ महाराष्ट्र गांधी चौक शाखेचे मॅनेजर आशिषजी दुपारे उपस्थित होते. आशिषजी दुपारे ह्यांनी बँकेच्या उद्योगांसाठी असलेल्या योजनानं बद्दल माहिती दिली व जास्तीत जास्त व्यावसायिकांनी बँकेसोबत जुडून बँकेच्या वित्तीय सेवे चा लाभ घेण्याची विनंती केली.

# माणिकराव सुखदेवे विद्यालयातील विद्यार्थ्यांची बल्याची पहाडी येथे क्षेत्र भेट

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा दि.१२सप्टेंबर:** माणिकराव सुखदेवे विद्यालय अशोकनगर, फुलमोगरा येथील वर्ग १० वी च्या विद्यार्थ्यांकरिता भूगोल विषयाच्या संबंधाने मुख्याध्यापक सुनिल घोल्लर यांच्या मार्गदर्शनात बल्याची पहाडी (झिरी ) येथे क्षेत्र भेट आयोजित करण्यात आली होती

भूगोल हे निरीक्षणाद्वारे शिकण्याचे शास्त्र आहे. एखाद्या प्रदेशास किंवा परिसरातील काही भोगोलिक घटकांचा अभ्यास प्रत्यक्ष त्या क्षेत्रात जाऊन, निरीक्षण करून माहिती मिळविता येते. वर्ग १० वी च्या विद्यार्थ्यांनी हा उपक्रम राबविण्यात आला होता.



विद्यार्थ्यांनी तेथील वृक्ष, वनस्पती, हवामान, भुरचना, खडक तसेच विविध प्राकृतिक घटकांचे निरीक्षण केले व तेथील पर्यावरण व मानवी सहसबंधाचा अभ्यास केला. मुख्याध्यापक सुनिल घोल्लर यांनी क्षेत्रभेटीबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सौम्य घोल्लर व आरोशी बागडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी क्षेत्रभेटीचा भरपूर आनंद घेतला उपक्रमासाठी सचिव अनंत डुंभरे, प्रकाश चौधरी, गजानन लिचडे, ईश्वरदास लाखडे, श्रावण चव्हाण, प्रतिभा जीभकाटे, जयश्री घोल्लर, रश्मी खोब्रागडे, स्वाती निकोसे, चंचल डुंभरे, राजेश मेश्राम, देवा वाट, धनंजय सेलोकर व वर्ग १० वी च्या विध्यार्थ्यांनी सहकार्य केले

# अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज आश्रम मोझरी अंतर्गत जांभळी येथे भंडारा जिल्हास्तरीय प्रचारक कार्यकर्त्याचा भव्य मेळावा

**महासागर प्रतिनिधी**

**सानगडी दि.१२सप्टेंबर:** साकोली जवळील जांभळी सडक येते मार्डतराव पाटील कापगते विद्यालय जांभळी येथे अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रम मोझरी अंतर्गत भंडारा जिल्हास्तरीय प्रचार कार्यकर्ता मेळावा व मध्यवर्ती प्रतिनिधी व प्रचारकाचा सत्कार सोहळ दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोज रविवारला आयोजित करण्यात आलेला आहे कार्यक्रमाचे उद्घाटक लक्ष्मणराव गमे सर्वाधिकारी, अध्यक्ष दामोदर पाटील उपसर्वाधिकारी, स्वागताध्यक्ष होमराज पाटील कापगते, प्रमुख वक्ते प्रकाश वाघ प्रचार प्रमुख, प्रा.अशोक चरडे चंद्रपूर जिल्हा सेवाधिकारी, प्रा. राम राऊत सरचिटणीस जिल्हा चंद्रपूर ,प्रमुख अतिथी विठ्ठलराव सावरकर प्रांत सेवाधिकारी नागपूर विभाग, बाबाराव पाटील केंद्रीय कार्यकारणी सदस्य, देवराव भांडारकर जीवन प्रचारक, नीलकंठ कळंबे नागपूर जिल्हा सेवाधिकारी ,अहिल्याबाई गोखले केंद्रीय प्रचार विभाग सदस्य,डॉ.वसंतराव बाळबुध्दे जिल्हाप्रमुख विश्व हिंदू परिषद भंडारा ,या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुशील दादा बुरडे भंडारा जिल्हा सर्वाधिकार, संचालन सौ. हेमलताताई मांडवटकर भंडारा जिल्हा महिला सर्वाधिकारी, आभार मोहन चोपकर भंडारा जिल्हा प्रचार प्रमुख करणार आहेत तेव्हा भंडारा जिल्ह्यातील श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान भंडारा जिल्हा सर्वाधिकारी सुशील दादा बुरडे यांनी केले आहे.

# हिवरा येथे पांदण रस्त्याच्या कामात प्रचंड गैरव्यवहार

*एकाच दिवशी एक मजूर दोन कामावर
*जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार



**महासागर प्रतिनिधी**

**मोहाडी दि.१२सप्टेंबर:** तालुक्यात रोजगार हमी योजनेची अवस्था अत्यंत चिंताजनक झाली असून दिवसेंदिवस गावागावातील पांदन रस्त्याच्या कामात होत असलेले घोटाळे उघडकीस येत आहेत. २०२४ - २५ या आर्थिक वर्षात कोट्यावधी रुपयांची कामे तालुक्यातील प्रत्येक गावात करण्यात आली. परंतु या कामातून गरीब कष्टकरी वर्गाच्या हाताला रोजगार मिळण्या ऐवजी ठेकेदार आणि सत्ताधारी नेत्यांचे खिसे भरले गेल्याचे चित्र तालुक्यात समोर आले आहे. मजुरांना प्रत्यक्ष कामावर न बोलवता यंत्राच्या सहाय्याने कामे करून आणि खोट्या मजुरांची नावे मस्टरमध्ये दाखवून त्यांच्या नावाने आलेले पैसे लाटले गेले. असे प्रकार मोहाडी पंचायत समिती अंतर्गत प्रत्येक गावात उघडकीस आले आहेत. तालुक्यातील हिवरा येथे रोजगार हमी योजने अंतर्गत पांदण खडीकरण रस्त्याच्या कामात प्रचंड गैरव्यवहार करण्यात आला असून कागदोपत्री काम दाखवून शासनाच्या निधीचा अपहार करण्यात आला आहे. गावात झालेल्या तीनही पांदण रस्त्याच्या कामात प्रचंड भ्रष्टाचार झाला आहे. त्यामुळे सदर पांदन रस्त्याच्या कामांची चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी , अशी मागणी किशोर रामटेके यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या तक्रारीतून केली आहे.

### बाहेर कामावर असलेले मजूरही हजेरीपटावर

हिवरा येथील झालेल्या रोजगार हमीच्या कामात अनेक बोगस मजुरांची नावे दाखविण्यात आली. यात बाहेरगावी विविध कामे करत असलेल्या व्यक्तींची नावे ऑनलाईन हजेरीपटावर दाखविण्यात आली असून त्यांच्या नावे पैशांची उचल करण्यात आली. या ठिकाणी घोटाळे बहादरांनी नवीन शक्कल लढवून शासनाच्या निधीचा अपहार केलेला आहे.

### एकाच दिवशी दोन कामांवर हजेरी

सदर रोहयोच्या कामात कसलीही भीती न बाळगता स्वतःच्या मनमर्जीने कामे करण्यात आली आहेत. जी व्यक्ती कधीही कामावर जात नाही अशाही व्यक्तींच्या नावे पैसे काढण्यात आले आहेत. काही व्यक्ती दुसऱ्या ठिकाणाच्या कामावर रुजू असतानाही त्यांची नावे रोजगार हमीच्या कामावर दाखविण्यात आले .

काही मजुर आपल्या स्थायी कामावर रुजू दिसत असून त्याच दिवशी रोहयोच्या कामावरही उपस्थिती दिसत आहे. त्यामुळे एकाच वेळी एकाच दिवशी अशा दोन ठिकाणी हजेरी लावून शासनाची दिशाभूल करून पैसे हडपण्याचा प्रयत्न झाला आहे.

### बोगस झालेली पांदन रस्त्याची कामे

हिवरा येथे रोजगार हमी योजने अंतर्गत झालेली सर्व कामे ही अत्यंत बोगस झालेली आहेत . यामध्ये तुमसर - रामटेक रोड ते नामदेव शेंडे यांच्या शेतापर्यंत , तुमसर - रामटेक रोड ते ताराचंद पुडके यांच्या शेतापर्यंत , तुमसर - रामटेक रोड ते प्रल्हाद लोंढे यांच्या शेतापर्यंत या तीन पांदण रस्त्याचा समावेश आहे.

हिवरा गावात रोजगार हमी योजने अंतर्गत पांदन रस्त्याचे काम सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात करण्यात आले. कागदोपत्री दाखविण्यात आलेल्या या पांदण रस्त्यावर कोणत्याही प्रकारचे मातीकाम प्रत्यक्षात झालेले नाही. ते केवळ कागदावरच दाखविण्यात आले. विना रॉयल्टीचा पातळ मुरूम वापरून शासनाच्या निधीचा मोठ्या प्रमाणात अपहार करण्यात आला. गावातील १५ ते २० व्यक्तींची खोटी नावे मस्टरमध्ये मजूर म्हणून दाखवून त्यांच्या नावे पैसे काढण्यात आले .

गावातील सर्वच नागरिक रोजगार हमीच्या कामावर जात नाही. परंतु जवळपास ३५ ते ४० व्यक्ती अशी आहेत जी कामावर न जाणारी आहेत त्यांची नावे दाखवून त्यांच्या नावावर पैशांची उचल करण्यात आली. एकंदरीत जे नागरिक कधीही कामावर जात नाही किंवा जे नागरिक गावाबाहेर कामावर जातात, जी नागरिक स्वतःच्या आधाराने उभी राहू शकत नाही अशा लोकांची नावे रोजगार हमीच्या कामावर दाखवून त्यांच्या नावे पैसे काढण्यात आले.

या प्रकारामुळे शासकीय निधीचा मोठ्या प्रमाणात अपहार झाला असल्यामुळे या प्रकरणाची तातडीने निष्पक्ष चौकशी करून सरपंच, ग्रामसेवक, रोजगार सेवक, तांत्रिक सहायक यांच्यावर योग्य ती कार्यवाही करून अपहार झालेली संपूर्ण रक्कम संबंधित जबाबदाराकडून वसूल करण्यात यावी व त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा , अशी मागणी किशोर रामटेके आणि गावकऱ्यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या तक्रारीतून केली आहे.

## सहआयुक्त, नगरपालीका प्रशासन कार्यालयाचे स्थलांतरण नागरिकांनी नोंद घ्यावी

**प्रतिनिधी**

**भंडारा :** जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथील सहआयुकत ,नगरपालीका प्रशासन कार्यालय स्थलांतरीत होत असून त्या कार्यालयाचा नविन पत्ता, अल्पसंख्याक वस्तीगृह, भंडारा तहसील कार्यालयाजवळ ,भंडारा येथे स्थलांतरीत होत आहे.तरी येत्या सोमवारपासून नागरिकांनी नविन स्थलातरीत ठिकाणी संपर्क करावा असे आवाहन सहआयुक्त करणकुमार चव्हाण यांनी केले आहे.

# महिला लोकशाही दिन १५ सप्टेंबरला

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि.१२सप्टेंबर:** समस्याग्रस्त व पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे, तसेच त्यांच्या हक्काचे संरक्षण होऊन न्याय मिळावा यादृष्टीने महिलांच्या तक्रारी/अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी व समाजातील पिडीत महिलांना सुलभ मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालया मार्फत जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा येथे प्रत्येक महिण्याच्या तिसऱ्या सोमवारी जिल्हास्तरावर महिला लोकशाही दिन आयोजित करावा असे शासन निर्णयान्वये निर्देश प्राप्त् आहेत.

त्याअन्वये सोमवार दिनांक १५/०९/२०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा येथे दु.,०१.०० ते०२.०० वाजेपर्यंत जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

महिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करण्याकीरता तक्रार अर्जाचा नमूना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, १ ला माळा, जिल्हा मजुर सहकारी संघ, साईनाथ नगर मातोश्री हॉस्पीटल समोर, नागपुर नाका, भंडारा, येथे उपलब्ध आहे.

तक्रारकर्त्यांनी त्यांच्या तक्रारी विहीत नमुन्यात किमान १५ दिवसांपुर्वी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, भंडारा यांचे कार्यालयास सादर करावेत.

जिल्हा स्तरीय महिला लोकशाही दिनात तक्रार अर्ज सादर करतांना अर्जासोबत मा. जिल्हाधिकारी यांना उद्देशून अर्ज, तालूका महिला लोकशाही दिन टोकन क्र. प्रत, मा. तहसिलदाराच्या उत्तराची प्रत (प्रकरण थेट जिल्हाधिकारी कार्यालयाशी संबंधित असेल तर तालुका महिला लोकशाही दिनातील टोकन क्रमांक व त्याची प्रत आवश्यक राहणार नाही) सोबत जोडावी. महिला लोकशाही दिनात न्याय प्रविष्ठ प्रकरणे/सेवा विषयक/आस्थापना विषयक/तक्रार निवेदन वैयक्तीक स्वरुपाचे नसेल तर अशा तक्रारी स्विकारण्यात येणार नाहीत.

# जानवी तरोणे महाराष्ट्र ज्युनिअर अथलेटिक्स गोळा फेक मध्ये राज्यात द्वितीय क्रमांक

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली दि.१२सप्टेंबर:** पुणे येथे महाराष्ट्र राज्य जुनीयर अथलेटिक स्पर्धेच आयोजन करण्यात आले होते. भंडारा जिल्ह्यातील पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल साकोली येथील सुशांत बांडेबुचे क्रीडा शिक्षक यांच्या नेतृत्वाखाली खेळाडूंनी सहभाग घेतला.

यामध्ये कु. जानवी तरोणे वर्ग १०वा मध्ये शिकत असलेली खेळाडू ज्युनिअर अथलेटिक्स गोळा फेक मध्ये सिल्वर मेडल प्राप्त केल्याने भंडाऱ्या जिल्ह्याचे नाव रोशन झालेले आहे.



या विद्यार्थिनीचे पीएमसी जिल्हा परिषद हायस्कूल साकोली चे शाळा समितीचे अध्यक्ष श्री मदन भाऊ रामटेके व शाळाव्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री हुसन बडोले यांनी अभिनंदन केले तसेच मुख्याध्यापक श्री धर्मेंद्र कोचे यांनी पुष्पगुच्छ देऊन विद्यार्थिनीचे कौतुक केले.

याप्रसंगी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बी आर चव्हाण, डॉ. मनोज बागडे , मनोहर भैसारे, धनराज मसराम, श्रीमती आशा चौधरी, कु. पल्लवी शिंदे , नरेश बाळबुदे, तोफिक सय्यद , सचिन लुटे, अमित डोये, मुकेश गुरनुले, कु पायल गणवीर, समीर कानेकर ,सौरभ मरसकोल्हे, गिरीश सोनवाणे, नेकराज वझाडे, प्रयागराज बोरकर, सौ.लीना हुमणे इमरान तुरक, मनीषा खुणे व तिलीस्मताई मेश्राम यांनी अभिनंदन केले.

## पहिल्या पालकमंत्री जनता दरबारात पवनी तालुक्यातून सर्वाधिक ३१ निवेदने; एकूण १०२ अर्जांची नोंद

**भंडारा :** भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या पालकमंत्री जनता दरबार या उपक्रमाला काल, ८ सप्टेंबर रोजी शुभारंभ झाला. नागरिकांच्या प्रश्नांना थेट व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या या पहिल्या जनता दरबाराला जिल्ह्यातून तब्बल १०२ निवेदने प्राप्त झाली. यामध्ये पवनी तालुक्याने आघाडी घेतली असून ३१ निवेदने प्राप्त झाली. त्यापैकी तालुका स्तरावरील २७ अर्ज, उपविभाग स्तरावरील १ अर्ज तर जिल्हा स्तरावरील ३ अर्ज नोंदविण्यात आले.

**इतर तालुक्यांतील आकडेवारी पुढीलप्रमाणे -**

**मोहाडी तालुका :** १९ अर्ज (१३ तालुका स्तरावरील, ६ जिल्हा स्तरावरील) लाखांदूर तालुका : १९ अर्ज (सर्व तालुका स्तरावरील) **भंडारा तालुका :** १४ अर्ज (११ तालुका स्तरावरील, ३ उपविभाग स्तरावरील) **तुमसर तालुका :** ९ अर्ज (७ तालुका स्तरावरील, १उपविभाग स्तरावरील, १ जिल्हा स्तरावरील) **लाखनी तालुका :** ७ अर्ज (सर्व तालुका स्तरावरील) **साकोली तालुका :** ३ अर्ज (२ तालुका स्तरावरील, १ जिल्हा स्तरावरील) या पहिल्या जनता दरबारामुळे जिल्ह्यातील नागरिकांच्या अपेक्षांना सकारात्मक दिशा मिळाली असून, विविध स्तरांवरील अर्ज तत्काळ कार्यवाहीसाठी संबंधित यंत्रणांकडे पाठविण्यात आले आहेत. पालकमंत्री डॉ. भोयर यांच्या सूचनांनुसार, या दरबारातून मिळालेली प्रत्येक समस्या नोंदवून जलद गतीने निराकरण करण्याचे आदेश प्रशासनाला देण्यात आले आहेत. नुकत्याच झालेल्या दौऱ्यातही त्यांनी अधिनस्त अधिकाऱ्यांना या उपक्रमाची काटेकोर अंमलबजावणी करण्यास स्पष्ट सूचना दिल्या होत्या. यापुढेही दर सोमवारी तहसील स्तरावर जनता दरबार आयोजित केला जाणार असून,नागरिकांनी आपापल्या स्थानिक कार्यालयांमध्ये अर्ज दाखल करून तहसीलदारांमार्फत आपले प्रश्न मांडावेत, असे आवाहन पालकमंत्री कार्यालयाने केले आहे.

# वडद अवैध उत्खनन प्रकरणात आरोप-प्रत्यारोप :पत्र परिषदेत चव्हाणांचा पलटवार

*'१७६/१ मधून कोट्यावधीचा महसूल गिळंकृत करणारा सुत्रधार चांदेवारच '
*'खोटी तक्रार, जातिवाचक शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी; प्रशासनाने दखल घ्यावी'

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली दि.१२सप्टेंबर:** अवैध गौण खनिज उत्खननाच्या प्रकरणावरून गंभीर आरोप-प्रत्यारोप रंगले असून पत्रकार परिषदेत सावरबांध येथील शेरसिंग चव्हाण यांनी देवचंद चांदेवार यांचे आरोप फेटाळून लावत पलटवार केला. शासनाच्या नियमानुसार महसूल शुल्क व रॉयल्टी भरून प्रामाणिकपणे काम करणाऱ्या पुरवठाधारकांना त्रास देणे, खोट्या तक्रारी दाखल करणे व समाजात दिशाभूल करणे हे चांदेवार यांचे पद्धतशीर षडयंत्र असल्याचा ठपका त्यांनी ठेवला.

चव्हाण म्हणाले की, १७६/१ हा गट क्रमांक काही वर्षांपूर्वी देवचंद चांदेवार यांनाच शासनाकडून लीजवर मिळाला होता. त्या काळात त्यांनीच मोठ्या प्रमाणात अवैधरित्या उत्खनन करून शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल गिळंकृत केला. त्यांच्या सोबत इतर गौण खनिज तस्कर सहभागी होते. अवैध व्यवहारामुळे अखेर त्यांचा व्यवसाय बंद करण्यात आला व सदर गट क्रमांक विद्युत विभागाला हस्तांतरित करण्यात आला. त्यामुळेच चांदेवार हताश होऊन खोट्या तक्रारींचा आधार घेत माझ्यासह इतरांवर बदनामी करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

चव्हाण यांनी स्पष्ट केले की, त्यांनी वडद येथील गट क्रमांक ४९७/१ मधूनच तहसीलदार साकोली यांच्या परवानगीने मुरूम उत्खनन केले होते. त्याचा १७६/१ शी कोणताही संबंध नाही. उलट १७६/१ मध्ये चांदेवार यांनी स्वतः परवाना काळात मोठ्या प्रमाणात अवैध उत्खनन केले होते.

'मी महसूल विभागाची रॉयल्टी भरून, सर्व कागदी प्रक्रिया पूर्ण करूनच शासनाच्या कामासाठी पुरवठा केला आहे. माझ्याकडे कायदेशीर कागदपत्रे असून कोणत्याही चौकशीला सामोरे जाण्यास मी तयार आहे,' असे त्यांनी ठामपणे सांगितले.

यावेळी त्यांनी देवचंद चांदेवार यांनी तहसीलदार यांच्याकडे केलेली तक्रार ही पूर्णतः खोटी व बिनबुडाची असल्याचे नमूद केले. या तक्रारीमागे राजकीय स्वार्थ असून, सत्य परिस्थिती लपवण्यासाठी व स्वतःचे अवैध कृत्य झाकण्यासाठी हा खोटारडेपणा केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला.



तसेच चव्हाण म्हणाले की, 'चांदेवार प्रामाणिकपणे काम करणाऱ्या पुरवठाधारकांना धमक्या देतात. त्यांचे म्हणणे न मानल्यास भांडण करणे, शिवीगाळ करणे, तक्रारी करण्याची धमकी देणे असे प्रकार वारंवार करतात. एवढेच नव्हे, तर मला जातिवाचक शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. याबाबत मी पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे. त्याचाच राग धरून त्यांनी काही समाजबांधवांची दिशाभूल करून परिसरातील वातावरण दूषित करण्याचे षडयंत्र सुरू केले आहे.'

चव्हाण यांनी प्रशासनाचे लक्ष वेधून सांगितले की, 'अशा बिनबुडाच्या तक्रारींमुळे शासनाच्या महसुलावर काम करणाऱ्या प्रामाणिक पुरवठाधारकांना त्रास होतो. त्यामुळे वरिष्ठ स्थानिक व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी जातीने दखल घेऊन प्रतिबंधात्मक कारवाई करावी.'

या पत्रकार परिषदेत मंगेश वैद्य, माजी सरपंच संजय बडवाईक, नरेश उर्फ राजे करंजेकर, प्रदीप वैद्य, निलेश शेंडे आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी एकमुखाने चव्हाण यांना पाठिंबा दर्शवून खोट्या तक्रारींचा निषेध केला.

# भाजप तर्फे पट्टेधारक नागरिकांना घरकुल मिळावे यासाठी मुख्याधिकारी यांना निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि.१२सप्टेंबर:** भंडारा शहरातील पट्टेधारक नागरिकांना घरकुल मिळावे यासाठी मुख्य अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. भंडारा शहरातील टाकळी परिसरामध्ये १९६२ मध्ये पट्टे वितरित करण्यात आले होते पण पट्ट्यांवर वारसानाची नोंद घेण्याची तरतूद शासनाकडे नसल्यामुळे सदर परिसरातील नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुलच्या लाभ घेता येत नसल्यामुळे स्थानिक गोरगरीब नागरिकांना या योजनेचा लाभ मिळत नाही टाकळी परिसरामध्ये मोलमजुरी करणाऱ्या नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आवास योजनेअंतर्गत सर्वांना पक्के घरे मिळावे यासाठी अनुसूचित जाती या प्रवर्गाप्रमाणे इतर (OPEN, OBC) यांना सुद्धा नगरपरिषद असेसमेंट कॉपी व टॅक्स पावतीच्या आधारावर घरकुल देण्यात यावा याचे निवेदन नगरपरिषद मुख्य अधिकारी करण चव्हाण यांना भारतीय जनता पार्टी जिल्हाध्यक्ष आशू गोंडाणे यांच्यासह रुबी चड्डा, सौ. चंद्रकला भोपे, शैलेश मेश्राम, शिव आजबले, यांच्या उपस्थितीत निवेदन देण्यात आले.



अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज आश्रम मोझरी अंतर्गत जांभळी येथे भंडारा जिल्हास्तरीय प्रचारक कार्यकर्त्याचा भव्य मेळावा

सानगडी साकोली जवळील जांभळी सडक येते मार्डतराव पाटील कापगते विद्यालय जांभळी येथे अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रम मोझरी अंतर्गत भंडारा जिल्हास्तरीय प्रचार कार्यकर्ता मेळावा व मध्यवर्ती प्रतिनिधी व प्रचारकाचा सत्कार सोहळ दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोज रविवारला आयोजित करण्यात आलेला आहे कार्यक्रमाचे उद्घाटक लक्ष्मणराव गमे सर्वाधिकारी, अध्यक्ष दामोदर पाटील उपसर्वाधिकारी, स्वागताध्यक्ष होमराज पाटील कापगते, प्रमुख वक्ते प्रकाश वाघ प्रचार प्रमुख, प्रा.अशोक चरडे चंद्रपूर जिल्हा सेवाधिकारी, प्रा. राम राऊत सरचिटणीस जिल्हा चंद्रपूर ,प्रमुख अतिथी विठ्ठलराव सावरकर प्रांत सेवाधिकारी नागपूर विभाग, बाबाराव पाटील केंद्रीय कार्यकारणी सदस्य, देवराव भांडारकर जीवन प्रचारक, नीलकंठ कळंबे नागपूर जिल्हा सेवाधिकारी ,अहिल्याबाई गोखले केंद्रीय प्रचार विभाग सदस्य,डॉ.वसंतराव बाळबुध्दे जिल्हाप्रमुख विश्व हिंदू परिषद भंडारा ,या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुशील दादा बुरडे भंडारा जिल्हा सर्वाधिकार, संचालन सौ. हेमलताताई मांडवटकर भंडारा जिल्हा महिला सर्वाधिकारी, आभार मोहन चोपकर भंडारा जिल्हा प्रचार प्रमुख करणार आहेत तेव्हा भंडारा जिल्ह्यातील श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान भंडारा जिल्हा सर्वाधिकारी सुशील दादा बुरडे यांनी केले आहे.

## नलिनी तिलकचंद तुरस्कर यांचे निधन



**भंडारा :** अत्यंत प्रेमळ स्वभावाच्या श्रीमती नलिनी तिलकचंद तुरस्कर यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी वृद्धापकाळाने दिनांक १२ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता दुःखद निधन झाले.

त्यांच्या अंत्ययात्रेचा प्रारंभ त्यांच्या राहत्या घरातून तिलकचंद नगर, पाटीदार भवन येथून दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी १०.०० वाजता होणार आहे.

## पोलीस पाटील सीताराम कापगते यांचा सेवानिवृत्ती सत्कार

**महासागर प्रतिनिधी**

**सानगडी दि.१२सप्टेंबर:** येथून जवळच असलेल्या कटंगधरा येथील पोलीस पाटील सीताराम हिरामण कापगते यांचा नुकताच पोलीस पाटील संघटना साकोलीच्या वतीने त्यांच्या निवासस्थानी सेवानिवृत्ती सत्कार कार्यक्रम पार पडला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साकोली विधानसभा क्षेत्राचे आमदार नाना पटोले प्रमुख अतिथी म्हणून भुजराज परशुरामकर, तालुका काँग्रेस कमेटी साकोलीचे अध्यक्ष अशोक कापगते, माजी सभापती मधुकर लिचडे, जिल्हा अध्यक्ष सुधाकर साठवणे, जिल्हा सचिव माधव बांते, साकोली तालुका अध्यक्ष देवराम चांदेवार, माजी तालुका अध्यक्ष गिरीधर बडवाईक, सानगडीचे सरपंच सविता उप्रीकर, कटंगधराचे सरपंच उशिका शेंडे, उपसरपंच दिगांबर रुखमोडे, तंमुस अध्यक्ष टिकेश्वर बडवाईक, बाळकृष्ण हटनागर, सेवानिवृत्त मुख्याध्यापक धनराज चांदेवार, विनोद रुखमोडे, अंताराम चांदेवार, ग्रामसेवक मडावी, शंकर कापगते व तालुक्यातील सर्व पोलीस पाटील प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी पोलीस पाटील सीताराम कापगते यांच्या जीवनपटावर मान्यवरांनी प्रकाश टाकला. परिसरातील गावातील पोलीस पाटील सेवानिवृत्त झाल्यानंतर सीताराम कापगते यांनी सासरा, कटंगधरा, सानगडी, विहीरगाव इ. गावांचा प्रभारी कार्यभार सांभाळला होता.



त्यांची कारकीर्द उत्तमरित्या पार पडली. त्यांच्या कार्याचा गुणगौरव व्हावा याहेतूने पोलीस स्टेशन साकोली व तालुका पोलीस पाटील संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस पाटील सीताराम कापगते यांच्या कटंगधरा येथील निवासस्थानी सपत्नीक सत्कार सोहळा पार पाडला. सहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**पत्ता : कार्यकारी अभियंता, यांत्रिकी अभियांत्रिकी कर्मशाळा विभाग, सदर, नागपूर**
E-mail:eemewdngp@yahoo.in Phone No. ०७१२-२९८१०४८

**निवीदा सुचना क्र. २०/ सन २०२५-२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी अभियांत्रिकी कर्मशाळा विभाग, सदर, नागपूर, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदा कारांकडुन खालील कामाकरीता निविदा मागवित आहे. महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/१११७/प्र.क्र.१०४/१७/यांत्रिकी दिनांक १४.०३.२०१८ अन्वये खालील कामांकरीता निविदा सादर करणारे कंत्राटदार, जलसंपदा विभागातील यांत्रिकी संघटनेकडे पंजिकृत असणे आवश्यक नाही. सदर निविदा सूचना जलसंपदा (यांत्रिकी) विभागाच्या वेबसाईटवरील क्र. www.mahayantriki.gov.in या संकेस्थळावर बघावयास मिळेल. निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **कार्यकारी अभियंता, यांत्रिकी अभियांत्रिकी कर्मशाळा विभाग, नागपूर,** यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर / www.mahayantriki.gov.in उपलब्ध करून देण्यात येईल.

**१. कामाचे नाव : भंडारा पूर संरक्षण अंतर्गत सा. क्र.. २३७० मी. वरील १५ टन क्षमतेचा ईओटी क्रेन करीता व विहीरीकरीता आवश्यक अतिरीक्त घटकभाग निर्मिती व उभारणी कामे.**

**किंमत रुपये :- रूपये ८०९४४/-**
**जिल्हा : भंडारा जिल्हा**
**निविदा विक्रीचा कालावधी: दि. २२.०९.२०२५ (११.०० वाजेपासून) ते दि. ३०.०९.२०२५ (१८.०० वाजेपर्यत)**
**निविदा सादर करण्याचा अंतिम कालावधी :- दि. २२.०९. २०२५ (११.०० वाजेपासून) ते दि. ३०.०९.२०२५ (१८.०० वाजेपर्यत)**
**निविदा उघडण्याचा कालावधी :- दिनांक ०१.१०.२०२५ ,१४.०० पासून कार्यकारी अभियंता, यांत्रिकी अभियांत्रिकी कर्मशाळा विभाग, नागपूर यांच्या कार्यालयात**

जा.क्र. /लेखा शाखा. २/निवीदा सुचना क्र. २०/२०२५-२६ **(वि.रा.प्रधान)**
**( जिमाका/ भंडारा/ जाहीरात/ २०२५/६५)** **कार्यकारी अभियंता ,यांत्रिकी अभियांत्रिकी कर्मशाळा विभाग, नागपूर**

RNI No.- MAHAMAR-2010/35801
महासागर भंडारा
**मालक,मुद्रक,प्रकाशक** -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर -१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,गांधी चौक समोर,भंडारा येथे प्रकाशित केले. **संपादक-** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -०७१२-२७६७६२८- ९३७३११७०४२ *स्थानिक संपादक-**सुरेश लक्ष्मण कोटगले,** फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)

